ISSN-2320-4494
RNI No.MAHAUL03008/13/2012-TC
Impact Factor : 2.7286

# POWER OF KNOWLEDGE

(5) Dr. Rajabhau Chavan (History)

An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal

## SPECIAL ISSUE : V
## FEBRUARY - 2021

ARTS | COMMERCE
SCIENCE | AGRICULTURE
EDUCATION | MANAGEMENT
MEDICAL | ENGINEERING & IT | LAW
PHARMACY | PHYSICAL EDUCATION
SOCIAL SCIENCE | JOURNALISM
MUSIC | LIBRARY SCIENCE |

www.powerofknowledge.co.in
E-mail : powerofknowledge3@gmail.com

Editor
Professor Dr.Sadashiv H. Sarkate

# संत रविदास यांचे स्त्रीमुक्ती विषयी विचार

**प्रा.चव्हाण आर.ए.**
इतिहास विभाग,
महिला महाविद्यालय, गेवराई जि.बीड

**प्रस्तावना :**

भारताचा इतिहास म्हणजे वंदणीय अशा अनेक संतांच्या भूमिचा इतिहास आहे. आपली संस्कृती ही जगातील सर्वोत्तम संस्कृती आहे. संत महात्म्यांच्या चरित्राचा ठसा या देशावर उमटला आहे. 'हे विश्वची माझे घर' म्हणणारी ज्ञानेश्वर माऊली, ढोंगबाजीवर कोरडे ओढणारे संत तुकाराम महाराज, भक्तीचा मळा फुलविणारे सावतामाळी, कीर्तनात रंगून ज्ञानदीप जगी लावणारे संत नामदेव त्यांचे शिष्य संत चोखोबा, नामयची दासी संत जनाबाई ही सारी संतांची प्रभावळ पाहिली की, महाराष्ट्र ही संतांची कर्मभूमी आहे. असे अभिमानाने सांगावे वाटते.

इ.स.नवव्या शतकापासून ते बाराव्या-तेराव्या शतकापर्यंतचा इतिहास पाहिल्यास संतानी आपल्या प्रभावी चारित्र्याने आणि तेजस्वी वाणीने भारतीय जनमानसावर विलक्षण प्रभाव गाजविला ज्ञानदेवानी ज्ञानाची पाणपोई उघडल्यामुळे महाराष्ट्रातील सर्व जनजाती मुक्तपणे ज्ञानाची लूट करु लागली दीर्घ काळापर्यंत अज्ञानाच्या कुशीत झोपून राहिलेला महाराष्ट्र खडबडून जागा झाला.[१] आपल्या बांधवांना गुलामीच्या प्रत्येक मार्गातून मोकळे करणे तसेच आपल्या कार्यात मोठ्या प्रमाणात यशस्वी झाले. आजचा काळसुध्दा आपल्या जातीसाठी परीक्षणाचा आहे. कारण आज सुध्दा समाजाचे तुकडे तुकडे होत आहेत. परंतु आमच्या संतांनी, महात्म्यांनी साहित्यकारांनी आणि लेखकांनी जर खुल्या मनाने कार्य केले तर ते या समाजाला दिशा देण्यास उपयोगी होवू शकते. उद्या येणारी पिढी आमची आदिम परंपरा, सांस्कतिक सभ्यता यांची राखन करु शकेल आम्हांला, मुलांना गौतम बुध्द, सद्‌गुरु रविदास, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या बहुमूल्य त्यागाविषयी सांगायचे आहे की, ज्यानी आपल्या जातीचा आत्मसन्मान आणि स्वाभिमान जीवंत ठेवण्यासाठी खूप कार्य केले आहे.

**संत रविदास आणि स्त्रीमुक्ती :**

संत रविदास हे पहिले महापुरुष आहेत. ज्यानी स्त्री जातीला समान हक्क दिले आणि मानव विरूध्द ताकदीच्या विचारधारांचा विरोध केला. जे म्हणत होते स्त्रीला ईश्वर भक्ती करण्याचा अधिकार नाही आणि पुरुषा बरोबर हक्क प्राप्त करण्याचा सुध्दा हक्क नाही. संत रविदासाने स्त्रीयांच्या सामाजिक समानतेसाठी संपूर्ण संघर्ष करुन त्यांना न्याय दिला त्यावेळेस जवळ जवळ सर्वच राण्या त्यांच्या शिष्य बनल्या.[२] स्त्रीला प्रेम आणि त्यागाच्या मुर्तीच्या रुपात मनुष्याच्या समान दृष्टीने पाहिले. महापुरुष केवळ एक या दोन व्यक्तिंनाच

आपले शिष्य बनवित होते. ते गुरुनंतर त्यांची गाधी सांभाळत परंतु सद्‌गुरुने स्त्री जातीला शिष्य बनवून त्यांच्यासाठी मुक्ती आणि समानेतेचा मार्ग प्रशस्त केला. संत रविदासाने चित्तेडच्या झाशी राणीला शिष्य बनवून एक नवीन रीत स्वीकारली. मीराबाईसुध्दा याच घराण्याची सून म्हणून आल्या सद्‌गुरुने मीराबाईचा राजकुमार भोजराज बरोबर विवाह करुन चांगला संयोग घडवून अनला. भोजराज लग्नानंतर सात वर्षातच एका लढाईत मारले गेले ; त्यावेळी भारतात पती बरोबर सती जाण्याची प्रथा होती. या विचारापासून तीला रविदासाने परावृत केले म्हणून तीने सती जाण्यास नकार दिला. त्यावेळी पंडितांनी खूप संघर्ष केला. पण मीराबाईने सांगीतले की येथून सर्वांनी आपापले कर्म भोगून जायाचे आहे. आणि मला माझे भक्ती कर्म उपभोगायंचे आहे. मी माझे कर्म करुनच ह्या जगातून जाईल सद्‌गुरुने मीराबाईला सती जाण्यापासून वाचविले म्हणजे ही प्रथा सुध्दा समाप्त झाली. सद्‌गुरु स्त्री जातीसाठी ईश्वररुप सिध्द झाले. आणि स्त्री जातीचा एक नवा अध्याय सुरु झाला. या काळात अशी समाज व्यवस्था होती की, ज्याचे मूळ जाती व्यवस्था होती. या कारणास्तव अस्पृश्य समाजावर अन्याय होत होता. मानवतेला पदोपदी अपमान सहन करावा लागला अमानवीय अन्यायाला तोंड देण्यासाठी काही महापुरुषांनी लढा दिला त्यात संत रविदास यांनी सामाजिक व्यवस्थेत असलेली उच्च नीचता, भेदभाव, जातीयता यांच्या विरोधात संघर्ष केला. विषमता आणि मानवी हक्काच्या हितासाठी कार्य केले. संत रविदासाची प्रत्येक कृती स्वातंत्र्य समता आणि बंधुता यांच्यावरच आधारित होती. १७८९ मध्ये फ्रेंच राज्यक्रांतीने जगाला दिलेली ही महान तत्त्वे चौदाव्या शतकात संत रविदासानी दिली होती. हाच खरा त्यांचा मानववाद होय.[३]

समाज व्यवस्था चांगली चालावी त्यासाठी जात, वंश, धर्म, रंग, लिंग इत्यादिंच्या आधारावर मनुष्य मनुष्यामध्ये कोणत्याही प्रकाराचा भेदभाव करता येत नाही. भारतीय समाज व्यवस्थेत् बद्दल ते म्हणतात की ती निधर्मी पाहिजे परमपिता परमेश्वर कोणाचीही संपत्ती नाही. तो सर्वांचा आहे जो त्यावर प्रेम करतो. त्याला तो भेटतो ईश्वराचे दरवाजे सर्व स्त्री-पुरुषांसाठी उघड आहेत. परंतु पंडित ही गोष्ट सहन करु शकत नाहीत की कोणी खालच्या कुळात जन्म घेवून धर्म प्रचारक किंवा धर्मगुरु होईल. संत रविदास धर्मनिरपेक्ष होते. हिंदू-मुस्लीम सर्वांना एक समान मानत होते. अशा प्रकारे म.फुले यांनी आपले विचार मांडले "सर्व स्त्री-पुरुषांनी या भूगोलावर आपले एक कुटुंब समजून एकमताने, एकजुटीने एकमेकांशी सत्यवर्तन करुन वागावे इतकेच काय तर एकाच घरात बौध्दधर्मी बायको, ख्रिस्तधर्मी नवरा, इस्लामधर्मी कन्या आणि सत्यधर्मी पुत्र यांना प्रेमाणे नांदायला लावीत तोचखरा धर्म."[४] एक महान सुधारक मानवतेचे रक्षक आणि धार्मिक चळवळीचे शिल्पकार त्यांची क्रांती अंहिसावादी होती. ज्या क्रांतीने मोठ मोठ्या राजांची सुलतानांची मने विचार बदलून त्यांच्या मनाला आत्मिक शक्तीच्या प्रयोगानी जिंकले होते. प्रत्येक धनिकाकडून धन घेतले नाही उलट

संपत्तीचा त्याग करुन टाकला. त्यांनी प्रत्येक संकट दूर करण्याचा संदेश दिला. न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व यांचा हिरिरीने पुरस्कार केला. म्हणून त्यागी युग पुरुष म्हटले तर वावगे ठरणार नाही. मानव जातीला मानवजातीला जन्मावरुन न पाहता नाही त्यांच्या कर्मावरुन पाहवे ही विश्वबंधुत्व-सर्वधर्म-समभावची पहिली पायरी आहे. कर्मवर अधिक विचार करुन संत रविदास म्हणतात.

'रविदास जनम के कारने, होत न कोऊ नीच।
निज करमन के कारनों, होत उँच अरू नीच ।।"[५]

**सारांश :**

प्रस्तुत शोध निबंध संत रविदास यांच्या स्त्रीमुक्तीच्या विचारावर आधारीत आहे. त्यांची साधी राहणी नम्र अशी विचारसरणीच्या जोरावर साऱ्या समाजाला दीपस्तंभासारखे मार्गदर्शक आहेत. सामाजिक विचारतून बंधुभाव आणि विश्वबंधुता, हिंदु-मुस्लीम ऐक्य, जातीभेद निर्मूलन, स्त्रीयांचे सबलीकरण, यासाठी प्रयत्न करुन नितिमूल्याची रुजवणूक केली २० व्या शतकात संत रविदासाचे विचार म.फुले, राजर्षी शाहु महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि डॉ.पंजाबराव देशमुख यांनी पुढे चालविले. स्त्री-पुरुष समानता या विचाराची आजही गरज आहे. तो विचार जनसामान्यापर्यंत जावा यासाठी हा छोटासा प्रयत्न मी या शोध निबंधात केला आहे.

**संदर्भ सूची :**

१) डॉ.आबणे राम, माझे शोधनिबंध, माता लक्ष्मी प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती, २०१०, पृ.क्र.३८

२) डॉ.आबणे राम, श्रीसंत रविदास चरित्र, साहित्य आणि विचार, माता लक्ष्मी प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, डिसेंबर २०१०, पृ.क्र.९५.

३) किता पृ.क्र.९६

४) डॉ.गाठाळ साहेबराव, आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, तृतीय आवृत्ती, जुलै २०१३, पृ.क्र.१४३.

५) रेखा द्विवेदी, राजीव दुबे, सर्वधर्म-समभाव एक विश्लेषण, राष्ट्रीय सांप्रादायिक सद्भाव, प्रतिष्ठान नई दिल्ली, प्रथम संस्करण, २००४, पृ.क्र.३९.

◆◆◆